| MHSN060039482018 | R.C.S./308/2018<br>Maruti Dadu Chavan Deceased Vs. Amol Raosaheb Darvandar |
|---|---|

# <u>नि.६० वरील आदेश</u>

१.            वादीने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती होणेसाठी दाखल केलेला आहे.

२.            वादीचे असे कथन आहे की, तहसिलदार, मिरज यांनी दि. ३०.०६.२०१८ रोजी रस्ता वहिवाट केस नं. १८/२०१७ मध्ये मामलेदार्स कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे मनाईचे चुकीचे आदेश केलेले आहेत. त्यामध्ये वादीचे वडील मारुती चव्हाण या मयत व्यक्तीस पक्षकार करुन मयत व्यक्ती विरुध्द चुकीचा निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये वादी पक्षकार नाहीत. त्यामुळे तहसिलदाराचे आदेश या वादीवर बंधनकारक नाहीत. वास्तविक पाहता तहसिलदाराने गट नं. ७५५ व ७५६ च्या सरबांधावर पुर्वापार वहिवाटीचा रस्ता असलेचे अनुमान काढून चुकीचा निर्णय दिलेला आहे. अशा प्रकारचा वहीवाटीचा रस्ता गट नं. ७५५ व ७५६ च्या सरबांधावर कधीही अस्तीत्वात नव्हता अगर कोणत्याही सरकारी नकाशामध्ये अशा प्रकारचा रस्ता नमूद नाही. प्रतिवादींच्या जमीनी वादीच्या जमिनीच्या उत्तर बाजूकडील ओढयाच्या उत्तर बाजूला असून त्याच्या जमिनीच्या जवळून सिध्देवाडी खंडेराजुरी डांबरी रस्ता चालू असून त्याच रस्त्याने प्रतिवादीची पुर्वापार वहिवाट आहे.

३.            त्यांचे पुढे कथन आहे की, वादीची जमीन दक्षिणेकडून उत्तरेकडे उतरली असून उत्तरेकडे ओढा असून तो २०० फूट रुंदीचा व २० फूट खोलीचा बारमाही पाणी प्रवाही ओढा आहे. त्यावर शासनाने सरकारी बंधारा बांधलेला आहे. त्यामुळे वादीच्या जमिनीलगत ओढयाचे पाणी तुंबलेले आहे. ओढयामध्ये जाणे येणे सारखी व रस्ता करण्याची परिस्थीती नाही. तसेच वादीच्या गट नं. ७५६ व ७५५ च्या जमिनीत बागायत पिके आहेत व वादीच्या जमिनी शेजारी पश्चिम बाजूकडे गट नं. ७५५ मध्ये संपूर्ण हद्दीपर्यंत द्राक्षबाग उभी

आहे. गट नं. ७५५ व ७५६ च्या शिवेवर फळांची झाडे असून त्यामध्ये विहीर, घर वगैरे आहे. त्याठिकाणी कोणताही रस्ता कधीही अस्तीत्वात नव्हता. वादीची जमिन निटोप्यात नसून त्यामध्ये ४ फूट उंच जमीन आहे. तहसिलदार मिरज यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जागेवर वस्तुस्थिती नाही. त्यामुळे जमिनी व त्यातील पिकाबाबत जमिनी खोलीबाबत झाड विहीर मोठा ओढा ओढयाचे अंतर, खोली या सर्व बाबी न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामी कोणत्याही शेतकरी वकिलांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होणे न्यायाने जरुरीचे आहे अशी वादीने विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल न केलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविणेत येत आहे.

५. अर्ज, दावा व कैफियत पाहीली, युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द कायम ताकीदीसाठी व हक्क स्थापनेकरीता दाखल केला आहे. दावा मिळकतीची सध्याची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक असलेने कोर्ट कमिशनर नेमून वाद जागेची सद्याची वस्तुस्थिती व हात नकाशा सादर झाल्यास वाद विषयाचा योग्य व परिणामकारक निर्णय होणेस मदत होणार आहे. त्यामुळे वाद जागेचा वस्तुस्थिती अहवाल व हात नकाशा कमिशनद्वारे निरिक्षण होवून वस्तूनिष्ठ अहवाल करणेकामी वकीलांची कमिशनर म्हणून नेमणूक करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. सबब सदरच्या वादमिळकतीच्या वादाबाबत वादी म्हणतात त्याप्रमाणे वकीलामार्फत पाहणी करुन घेतलेस सदरचा दावा गुणदोषावर चालविणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणेस योग्य होईल. सबब वादीचा अर्ज मंजूर करणे संयुक्तिक व न्यायाचे ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

१ श्री. एफ. जी. तांबोळी, वकील यांची प्रस्तुत कामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणेत येत आहे.

२ त्यांना असा निर्देश देणेत येत आहे की, त्यांनी वादीने अर्जात

नमूद केलेप्रमाणे वादमिळकतीची सद्यस्थितीची वस्तुस्थितीची पाहणी व मोजणी करुन त्याप्रमाणे मोजणीसह नकाशा तयार करावा व त्याबाबतचा अहवाल या न्यायालयात दोन महिन्यात सादर करावा.

३ न्यायालयीन आयुक्तांनी सर्व पक्षकारांना पूर्व नोटीस देवून कमीशन करावे. सदर कामी दोन्ही पक्षकारांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी न्यायालयीन आयुक्तांना लागेल ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन योग्य ते सहकार्य करावे.

४ वादीने न्यायलयीन आयुक्तांची फी म्हणून र.रु.५,०००/–, न्यायालयात भरावी.

५ वरीलप्रमाणे पूर्तता झालेनंतर कमीशन पत्र काढणेत यावे.

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.07.17 11:38:59 +0530

ठिकाणीः–मिरज. (अनिरुध्द एस. राणे)
दिनांकः– १५.०७.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर मिरज.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of thare P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magaretrate First Class, Miraj, Daret., Sangli. | | |
| Date of decareion / typed | :- | 15 | 07 | 2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 15 | 07 | 2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 17 | 07 | 2025 |